पुण्य नगरी

# संरक्षणातील आव्हानांचा सामना करण्यासाठी सामंजस्य करार

**पुणे** : संरक्षण क्षेत्रातील अनुभवाबरोबरच येणाऱ्या आव्हानांचा सामना विद्यार्थ्यांना करता यावा याकरिता विश्वकर्मा विद्यापीठ आणि जे. कुमार डिफेन्स अँड एरोस्पेस प्रा. लि. यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. या प्रसंगी विद्यापीठाचे अध्यक्ष भरत अगरवाल, जे. कुमारचे मुख्य कार्यकारी अधिकारी युसूफ इनामदार, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सिद्धार्थ जबडे उपस्थित होते.

कराराचा उद्देश शिक्षण क्षेत्र आणि उद्योग यांच्यातील दरी कमी करून विद्यार्थ्यांना प्रकल्पांद्वारे प्रत्यक्ष अनुभव मिळवून देणे आहे. शिवाय, या माध्यमातून प्राध्यापकांना उद्योगासमोरील आव्हानांवर काम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या कराराअंतर्गत जे. कुमार डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनी संरक्षण मंत्रालयासाठी प्रशिक्षण आणि जनजागृती सत्रांचे आयोजन करेल, तसेच विद्यापीठाला सल्लागारिता प्रकल्पही देईल.

युसूफ इनामदार म्हणाले, देशाच्या संरक्षण क्षेत्राचे भारतीयीकरण सुरू झाले आहे. यामुळे भारतीय तरुणांना देश संरक्षणासाठी अभूतपूर्व आव्हानांना सामोरे जाण्यासाठी काम करण्याची उत्तम संधी उपलब्ध झाली आहे. विश्वकर्मा विद्यापीठ आणि त्यांच्या संस्थांशी असलेले आमचे सहकार्य हे संरक्षण क्षेत्रातील आव्हानांचा सामना करण्यासाठी निश्चितच उपयोगी पडणार आहे.

भरत अगरवाल म्हणाले, या करारामुळे विद्यार्थ्यांना संरक्षण क्षेत्रात येणाऱ्या समस्या सोडवण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल. विद्यार्थ्यांना या अनुभवाचा फायदा होईल आणि त्यांच्यासाठी ही एक उत्कृष्ट कामाची संधी ठरेल.

Pune Edition

Jan 22, 2025 Page No. 01

Powered by: erelego.com